https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –१२० रविवार दि.०४ जानेवारी २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-120 Sunday, Dt.04 January 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## महिलांना कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी पुरुषांनी द्यावी - माजी आमदार अँड.उषाताई दराडे

## अपमान सहन करूनही समतेचा दीप सावित्रीबाईंनी तेवत ठेवला – फौजदार पल्लवी जाधव



## जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात पत्रकारांच्या वतीने सावित्रीच्या लेकींचा गुणगौरव सोहळा संपन्न

बीड /प्रतिनिधी

प्रत्येक महिलांमध्ये कर्तुत्व सिद्ध करण्याची हिंमत आणि ताकद आहे. फक्त पुरुषांनी त्यांना योग्य संधी दिली पाहिजे तेव्हा महिला अबला नसून सबला आहेत हे सिद्ध होईल अशी भावना माजी आमदार उषाताई दराडे यांनी व्यक्त केली. तर त्या काळात अपमान सहन करून ही समतेचा दीप सावित्रीबाईंनी तेवत ठेवला. आज तोच विचार आणि आचार समोर ठेवून प्रत्येकाने समतेचा दीप तेवत ठेवण्याची गरज आहे असे प्रतिपादन दामिनी पथकाच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांनी व्यक्त केले.

बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता भारतातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि तिथीनुसार राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून दैनिक समर्थ राजयोग आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या संयुक्त विद्यमाने प्रशासनातील सहा महिला अधिकाऱ्यांचा सावित्रीच्या लेकी बनल्या प्रशासकीय अधिकारी – २०२६ या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अँड. उषाताई दराडे लाभल्या. तर व्यासपीठावर सत्कारमूर्ती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष तथा दामिनी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव मॅडम, बीड एसटी महामंडळाच्या विभाग

(उर्वरीत पान २ वर)

### सामाजिक क्रांतीच्या लढ्यात सहभागी होण्याची गरज – वैभव स्वामी

धैर्य आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक म्हणून राजमाता जिजाऊ यांच्याकडे पाहिले जाते. तर सामाजिक क्रांतीच्या अग्रदूत म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्याच विचारांवर आजही आणि भविष्यातही सामाजिक क्रांती घडवण्याची खरी गरज आहे. मुलींना गर्भात मारणे गुन्हा आहे. तिला जगण्याचा नैतिक अधिकार आहे. आणि पुरुषाप्रमाणेच तिला देखील कोणताही दुजाभाव न करता जगण्याची संधी दिली पाहिजे. तरच सामाजिक समतोल राखला जाईल. आणि तो राखण्यासाठीच आता लेखणीसोबत प्रत्यक्ष कृतीतून कार्य करण्याचा प्रयत्न भविष्यात करणार आहे. मी देखील या निराधारांचा आधार आणि अबला महिलांना सबला करण्यासाठी त्यांच्या पाठीशी सक्षमपणे उभा राहणार आहे,असे कार्यक्रमाचे मुख्य आयोजक पत्रकार वैभव स्वामी यांनी जाहीर केले.

### अतिशय योग्य ठिकाणी पुरस्कार स्वीकारताना आनंद वाटला – सत्कारमूर्ती दुसाने, जेथलिया

राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून पत्रकार वैभव स्वामी यांनी आज आम्हाला सावित्रीच्या लेकी बनल्या प्रशासकीय अधिकारी – २०२६ या सन्मानाच्या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरवांकित केले. आज हा पुरस्कार निराधार, बेघर यांच्या उपस्थितीत स्वीकारण्याचे भाग्य मिळाले. त्यांच्या वेदना समस्या प्रत्यक्ष अनुभवता आल्या. त्यामुळे खऱ्या अर्थाने आज आमच्या कार्याचा गौरव झाला. याचा आनंद आणि अभिमान अधिक वाढला आहे.या पुरस्कारामुळे आम्ही या सामाजिक दरीमधील दुरावा कमी करण्यासाठी आमच्या पदाचा निश्चित उपयोग करू आणि आमच्या प्रमाणेच इतर मुली, महिला प्रगतीच्या दिशेने पुढे कशा जातील यासाठी प्रयत्न करून अशा भावना बीड एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रक सौ.अनुजा दुसाने आणि बीड जिल्हा परिषदेच्या सहाय्यक लेखाधिकारी सौ.शिल्पा जेथलिया यांनी व्यक्त केल्या.









दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)



रविवार दि.०४ जानेवारी २०२६
SUNDAY, DT.04 JANUARY 2026



## संपादकीय....

# खासगीकरण.. बेस्ट उपक्रमाच्या अंगलट

झपाट्याने बदलणाऱ्या मुंबईच्या विकासासोबतच शहरातील रस्ते मृत्यूचे सापळे ठरत असून, बेस्ट बस अपघातांच्या वाढत्या घटनांनी 'विकास' आणि 'सुरक्षितता' यातील दरी भयावहरीत्या उघडी पडली आहे.

सुरक्षित आरामदायी प्रवास म्हणून बेस्ट बसेसना आजही प्रवासी प्राधान्य देतात. बेस्ट उपक्रमातील कायमस्वरूपी कामगार म्हणजे कधीही बिनधास्त प्रवास करा, अशी बेस्ट उपक्रमाची ओळख. आशिया खंडातील सर्वात दर्जेदार सेवा देणारी म्हणून बेस्ट उपक्रमाची जगभरात ओळख निर्माण झाली आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून बेस्ट उपक्रमात कंत्राटी पद्धतीचा बोलबाला आहे. कंत्राटी पद्धतीवर बसेस नंतर कंत्राटी चालक व वाहक यामुळे बेस्ट उपक्रमाची खासगीकरणाकडे वाटचाल सुरू असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला होता. मात्र विरोधकांचा आरोप फेटाळत खासगीकरण नसल्याने बेस्ट उपक्रमाने स्पष्ट केले असले तरी प्रत्यक्षात कंत्राटी पद्धतीवर बेस्ट उपक्रमाचा अंकुश नाही, हे वारंवार सिद्ध होत आहे. बेस्ट उपक्रमात २३ ते २४ हजार कायमस्वरूपी कामगार शिल्लक असून बाकी संपूर्ण कारभार कंत्राटी पद्धतीवर अवलंबून आहे. कुठलीही आस्थापना असो कायमस्वरूपी कामगाराची कामाप्रति जबाबदारी असते आणि काही घडले तर त्याला जाब विचारला जातो. मात्र बेस्ट उपक्रमात एखादी घटना घडली की कंत्राटदार हात वर करतो आणि आरोप बेस्ट उपक्रमावर होतो. त्यामुळे कंत्राटी पद्धत बेस्ट उपक्रमासाठी तापदायक ठरू लागली आहे.

आर्थिक डबघाईस आलेल्या बेस्ट उपक्रमास रुळावर आणण्यासाठी बेस्ट उपक्रमातील माजी सत्ताधारी पक्षाने भाडेतत्त्वावरील बसेस आणण्याचा निर्णय घेतला आणि हळुवार कंत्राटी कामगारांचे वर्चस्व प्रस्थापित होत गेले. कंत्राटी कामगारांचा थेट बेस्ट उपक्रमाबरोबर संवाद नसला, तरी कंत्राटी कामगार मुंबईला वेठीस धरू शकतात, हे अनेकदा केलेल्या आंदोलनावरून स्पष्ट झाले आहे. कंत्राटी कामगारांनी आंदोलनाचे हत्यार उपसले तर कंपनीवर कारवाई करणार, असा इशारा बेस्ट उपक्रमाकडून दिला जातो. मात्र कंत्राटी कामगारांच्या आंदोलनात भरडला जातो तो प्रवासी. कंत्राटी बसचालकांची मनमानी प्रवाशांना नेहमीच अनुभवयास मिळते. बस थांब्यावर बस न थांबवणे, बस थांब्यावर बस आली तर प्रवाशांना बसमध्ये चढण्यास मज्जाव करणे, प्रवाशांबरोबर नाहक हुज्जत घालणे हे प्रवाशांसाठी सवयीचा भाग होत चालला आहे.

## हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त

# हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो लोकांपर्यंत गौरवशाली इतिहास पोहचणार





नांदेड /प्रतिनिधी

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित उपक्रमाचा 'आरंभता की अरदास' हा विधी आज नांदेड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी मुख्य कार्यक्रमाच्या मंडपाचे भूमीपूजन तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वाराचे पंचप्यारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकि, भगत नामदेव संप्रदाय व उदासीन संप्रदाय या समाजातील संतांची उपस्थिती लाभली होती.

हिंद-दी-चादर कार्यक्रमाचा औपचारिक प्रारंभ तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा अबचलनगर नांदेडचे मुख्य जथ्थेदार संत बाबा कुलवंत सिंगजी यांच्यासह भाई जोसिंदर सिंगजी, भाई राम सिंगजी, भाई कश्मीर सिंगजी, भाई गुरमीत सिंगजी तसेच गुरुद्वारा लंगर साहिबचे संत बाबा बलविंदर सिंगजी यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी विधान परिषदेचे सदस्य बाबुसिंग महाराज (पोहरादेवी), जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, तहसीलदार संजय वारकड, ३५० वा शहीदी समागम समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, महंत सुनिल महाराज, महंत जितेंद्र महाराज, क्षेत्रीय समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, सरजीत सिंग गिल, क्षेत्रीय समितीचे पदाधिकारी, राज्यस्तरीय समितीचे सदस्य उपस्थित होते.


### जाहीरनामा

**मा.श्री.कृष्णराव के.पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १९३५/२०२५**
**रमेश कुलकर्णी वि.निरंक विधीज्ञ-श्री जितेंद्र पांडव**
**मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार :
**१. रमेश बालाजी कुलकर्णी, वय-५५ वर्षे, धंदा-खाजगी नौकरी, रा.छापखाना गल्ली, धोंडीपुरा रोड, बीड ता.जि.बीड**
**२. शैला अरूण कुलकर्णी, वय-५७ वर्षे, धंदा-घरकाम, रा.खुनेश्वर, सोलापुर ता.जि.सोलापूर**
**विरूध्द निरंक**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे पुष्पा बालाजी कुलकर्णी, रा.छापखाना गल्ली, धोंडीपुरा बीड ता.जि.बीड हे दि.२३.१०.२०२५ रोजी राहत्या घरी बीड ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत.अर्जदार क्र.१ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र.२ ही मयताची विववाहित मुलगी आहे. मयत नामे पुष्पा बालाजी कुलकर्णी यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदर सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्यातचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येतेकी, जर सदरहु कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत पुष्पा बालाजी कुलकर्णी यांचे वारस असल्याबाबचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारिख ०४.०२.२०२६ आहे

आज दि.०२.०१.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**स्वाक्षरित/-**
**क.लिपीक**
**सह दिवाणी न्यायालय**
**व.स्तर,बीड**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड**



### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस. एच. पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०४०/२०२५**
**बळीराम विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड, ए.बी. बांगर गेवराई)**

व्याअर्थी मयत नामे प्रविण पि. बळीराम सुळे हे दिनांक १६/०४/२०२४ रोजी रा. मौजे लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत, अर्जदार १. बळीराम पि. दाजीबा सुळे वय ५९ वर्षे, धंदा शेती, रा.लुखामसला, ता. गेवराई जि. बीड २. सुमन पि. बळीराम सुळे वय ५२ वर्षे धंदा शेती, रा.लुखामसला, ता. गेवराई जि. बीड ३. प्रदिप पि. बळीराम सुळे २४ वर्षे धंदा शेती, रा.लुखाममला, ता.गेवराई जि.बीड

यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदर सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्यातचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येतेकी, जर सदरहु कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत प्रविण पि.बळीराम सुळे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२६.१२.२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारिख ०८.०२.२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ९९०/२०२५**
**कमलामाई आश्रुबा अवघडे व इतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. पी. पी. रुईकर, गेवराई)**

अर्जदार - १. कमलाबाई भ्र. आश्रुबा अवघडे, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. तळणेवाडी ता. गेवराई जि.बीड.

२. विमलबाई भ्र. प्रभाकर हातागळे, वय ५५ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. हिरडपुरी ता. पैठण जि. औरंगाबाद. (छ. संभाजीनगर)

ज्याअर्थी मयत लक्ष्मण पि. दगडु सुतार, रा. तळणेवाडी ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २३/१२/२०२३ रोजी मौजे रा. तळणेवाडी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ व २ यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरह मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत लक्ष्मण पि. दगडु सुतार, रा. तळणेवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यान येईल.

आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः- १५/०१/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क.१०१५/२०२५**
**मुबीन नुर शेख विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड.ए.के. शेखन, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे नुर चंदुमियों शेख हे/हया दिनांक १४/१२/२०२० रोजी मौजे तलवाडा ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. खालील प्रमाणे अर्जदार नामे-

१ मुबीन नुर शेख वयः४७ वर्षे, धंदाः मजुरी, रा. तलवाडा ता. गेवराई जि. बीड

२. शफी नुर शेख, वयः ७० वर्षे, धंदाः मजुरी रा. तलवाडा ता. गेवराई जि. बीड ह.मु. रांजनगाव पो. बजाजनगर ता. गंगापुर जि. औरंगाबाद

३. शेख नफीस शेख नुर, वयः ५९ वर्षे, धंदाः मजुरी रा. तलवाडा ता. गेवराई जि.बीड

४. शेख जमीर नुर, बयः ४६ वर्षे, धंदाः मजुरी रा. तलवाडा ता. गेवराई जि. बीड

५. मदीनाबी रशीद शेख, वयः ४९ वर्षे, धंदाः घरकाम रा. फुलेनगर माजलगांव ता. माजलगाव जि. बीड

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नुर चंदुमियों शेख हे चे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक. १६/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २२/०१/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०५९/२०२५**
**निलाबाई भ्र. नाथा बनसोडे व इतर वि. निरंक**
**( मार्फत ॲड. ए. के. शेख, गेवराई)**

अर्जदार -

१. निलाबाई भ्र. नाथा बनसोडे, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. पाथरवाला (बु.) ता. अंबड जि. जालना, २. सोजरबाई भ्र. विठ्ठल आखाडे, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाकड ता. मुळशी जि.पुणे. ३. गंगा भ्र. किसन म्हेत्रे, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. गेवराई ता. गेवराई जि. बीड. ४. उर्मिला भ्र. भाऊसाहेब लेंडाळ, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. जातेगांव ता. गेवराई जि. बीड. ५. गणेश पि. नाथु उर्फ नाथाराव साखरे, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड. ६. भास्कर पि. नाथु उर्फ नाथाराव साखरे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड. ७. सुरेश पि. वशिष्ट धोत्रे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. माळीवेस, बीड ता. जि.बीड.

ज्याअर्थी मयत नाथु उर्फ नाथाराव पि. गोविंदराव उर्फ गोविंदा साखरे, रा. मौजे धोंडराई ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक १२/०२/२०१७ रोजी रा. मौजे धोंडराई ता. गेवराई जि. बीड येथ मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ७. यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणण असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याना हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नाथु उर्फ नाथाराव पि. गोविंदराव उर्फ गोविंदा साखरे, रा. मौजे धोंडराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २६/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः ०५/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०४५/२०२५**
**सुशील श्रीपाल गंगवाल विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड.पी.एम. वाघमारे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे श्रीपाल पि. दिपचंद गंगावल हे/हया दिनांक.०३/१०/२०२३ रोजी गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. खालील प्रमाणे अर्जदार नामे

१. सुशील पि. श्रीपाल गंगवाल, वयः ५४ वर्षे, धंदाः शेती, राः गेवराई ता. गेवराई जि. बीड ह.मु. व्यंकटेश कॉलनी स्टेशन रोड, औरंगाबाद

२. संदिप पि. श्रीपाल गंगवाल वयः ५२वर्षे, धंदाः शेती, राः गेवराई ता. गेवराई जि. बीड ह.मु. व्यंकटेश कॉलनी स्टेशन रोड, औरंगाबाद

३. अरूणा भ्र.. श्रीपाल गंगवाल वयः ७६ वर्षे, धंदाः शेती, राः गेवराई ता. गेवराई जि.बीड ह.मु.व्यंकटेश कॉलनी स्टेशन रोड, औरंगाबाद

यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत श्रीपाल पि. दिपचंद गंगावल हे चे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक. २४/१२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पूढील तारीख ३०/०१/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०५२/२०२५**
**रंगनाथ उर्फ रंगराव विरुध्द निरंक**
**(मार्फत ॲड.येवले एस.पी.)**

ज्याअर्थी मयत नाम मथुराबाई भ्र.बाबासाहेब काकडे हे/हया दिनांक.२१/१०/२०२५ रोजी निपाणी जवळका ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. खालील प्रमाणे अर्जदार -

१. रंगनाथ उर्फ रंगराव पि.बाबासाहेब काकडे, वय-७५ वर्षे, धंदा-शेती, रा.निपाणी जवळका ता.गेवराई जि.बीड

यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे मथुराबाई भ्र.बाबासाहेब काकडे रा.निपाणी जवळका ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक. -/-/- रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पूढील तारीख ०६/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई


पान १ वरून...

### महिलांना कर्तृत्व सिद्ध....

नियंत्रक सौ.अनुजा दुसाने मॅडम, बीड जिल्हा परिषदेच्या सहाय्यक लेखाधिकारी सौ.शिल्पा जेथलिया, मुंबई हायकोर्टात वर्ग एक या पदावर नुकतीच निवड झालेल्या कु. प्रियंका देशपांडे,स्वाधार ग्रहाच्या अधीक्षिका श्रीमती आशा धनवडे आणि जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील काळजीवाहक श्रीमती छाया सरोदे या सत्कारमूर्तींसह कार्यक्रमाचे मुख्य आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जावेद भाई कुरेशी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण दादा ढवळे, त्यांच्या सुविध पत्नी.... ज्येष्ठ पत्रकार नारायण नागरे, प्रतिष्ठित नागरिक श्रीकृष्णजी जेथलिया, दैनिक दिव्य मराठीचे बीड जिल्हा व्यवस्थापक प्रशांत देशपांडे, शेख फरहीन राणी मॅडम, दिलीप चिंचोलकर, बाबा जाधव, महारुद्र मोराळे, प्रकाश कुलकर्णी, भारत माने, गौतम वंजारे, गायक इनकर यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली.

पुढे बोलताना माजी आमदार उषाताई दराडे म्हणाल्या, स्त्री शिक्षण विधवा विवाह, अस्पृश्यता निर्मूलन यासाठी सावित्रीबाईंनी अथक संघर्ष केला. त्यांच्या या संघर्षाला खऱ्या अर्थाने महात्मा ज्योतिबांनी पाठबळ दिलं. खंबीर साथ दिली. त्यामुळेच त्या कणखरपणे स्त्री शिक्षणाच्या जननी होऊ शकल्या. आज सुद्धा प्रत्येक घरात सावित्री जन्मण्यासाठी तिच्या पाठीशी ज्योतिबा उभारला पाहिजे. तरच महिलांचे कर्तुत्व सिद्ध होईल. महिला प्रत्येक क्षेत्रात कर्तुत्वान आहेत हे त्यांनी सिद्ध केल आहे आणि आज पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी बीड जिल्ह्यात पहिल्यांदा सावित्रीबाईंच्या जयंतीनिमित्त प्रशासनातील अधिकारी असलेल्या महिलांचा सत्कार करून खऱ्या अर्थाने इतर मुलींपुढे,महिलांपुढे आपण सुद्धा या महिला अधिकाऱ्यांप्रमाणे घडले पाहिजे यासाठी केलेली जागृती निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक आहे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ यांच्या विचारांचे समर्थक जिल्हाभरातून मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कारमूर्तींना सन्मानचिन्ह,शाल, पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी सत्कारमूर्तींनी आपल्या भावना व्यक्त केल्या आणि या उपक्रमाबद्दल पत्रकार वैभव स्वामी यांचे विशेष अभिनंदन केले. कार्यक्रमाची सांगता जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील लाभार्थ्यांना स्नेहभोजन देऊन करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिव्हाळा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे यांनी केले आणि आभार पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा रफिक यांनी मानले.

## परतुर पोलीस स्टेशनचे दबंग पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांची

# गोवंशीय जनावरांची अवैधरित्या करणाऱ्या वर ३४,लाख,३० हजाराची दबंग कारवाई

परतूर /तारेख शेख

परतुर पोलीस स्टेशनचे दबंग पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांची दबंग कारवाई ३४ लाख ३० हजाराची

गोवंशीय जनावरांची अवैधरित्या करणाऱ्या वर दबंग कारवाई करण्यात आली आहे तसेच मिळलेली माहितीनुसार कंटेनर वाहनामधुन वाहतुक करणा-या ०४ आरोपी ताब्यात घेऊन त्यांचेकडुन २६ गोवंशीय बैल व ०१ कंटेनर असा एकूण ३४,३०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पोलीस ठाणे परतुर यांनी कार्यवाही केली आहे तसेच परतुर शहरातील व तालुक्यातील चोरीस गेलेल्या गोवंशीय जनावारांची गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी वेळोवेळी सुचना देऊन आदेशीत केलेले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.एस. बी. भागवत यांनी पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार यांचे एक पथक गोवंशीय जनावारांची चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी नेमलेले आहे. पथकातील अधिकारी अंमलदार हे परतुर शहरातील व तालुक्यातील चोरीस गेलेल्या गोवंशीय जनावारांची संबंधाने तांत्रीक विश्लेषण करीत होते. दिनांक ०१/०१/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री. भागवत व स्टाफचे अंमलदार हे आष्टी ते परतुर रोडवर पेट्रोलींग करीत असतांना श्री. भागवत यांनी माहिती मिळाली की, परतुर कडुन आष्टी कडे एका कंटेनर मध्ये गोवंशीय जनावर घेऊन जात आहेत अशी खात्रीशिर माहिती मिळाली होती. त्यावरुन दिनांक ०२/०१/२०२६ रोजी मध्यरात्री ०२.३० वाजेसुमारास श्री. भागवत यांनी परतुर कडुन आष्टी जाणा-या उड्डाणपुलावर नाकाबंदी करुन संशयीत कंटेनर अडविले असता गोवंशीय जनावरे आढळुन आली. सदर गोवंशीय जनावराच्या दाखले व वाहतुक परवाना बाबत विचारपुस केली असता त्यांचेकडे कुठलीही कागदपत्रे आढळून आलेली नाहीत. कंटेनरमध्ये बसलेले चालक व इतर लोकांना त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नावे १. साबेर सुपडु कुरेशी २. मुक्तार सुलतान कुरेशी ३. असलम सुपडु कुरेशी रा. वाघरी ता. जामनेर जि. जळगाव ४. रमजान सुभान शेख रा. कमालपुरा ता. मालेगाव जि. नाशिक असे सांगितले. सदर कंटेनरमधील जनावारांची पाहणी केली असता एकूण २६ गोवंशीय बैल किंमती १४,३०,००० रुपयांचे मिळून आलेले आहेत. सदर आरोपीताविरुध्द पोलीस ठाणे परतुर महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम व प्राण्यांचा



छळ प्रतिबंधक अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन गुन्हयाचा तपास पोउपनि श्री. रावते हे करीत आहेत.सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बसंल, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. आर.टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक श्री. एस. बी. भागवत, पोउपनि श्री. रावते, अंमलदार धर्मा शिंदे, गोविंद पवार, गजानन राठोड, परमेश्वर माने, दशरथ गोपणवाड, विजय जाधव, नरेंद्र चव्हाण, बाबासाहेब खरात, सतिष जाधव, चालक अतुल खंदारे, यांनी केलेली आहे.

# दुग्धव्यवसाय, पैलवानकी आणि राजकारणाचा प्रेरणादायी त्रिवेणी संगम म्हणजे तुफानातला दिवा सतीश आबा शिंदे



आष्टी - वादळ कितीही भीषण असो, सर्वकाही उद्ध्वस्त करून टाकणारे असो - तरीही त्या तुफानात जर एखादा दिवा अखंड तेवत राहिला, तर तो केवळ प्रकाश देत नाही तर इतिहास घडवतो. राजकारण, समाजकारण आणि व्यवसायाच्या अशाच वादळी प्रवाहात स्वतःचे अस्तित्व टिकवून, संघर्षाला न डगमगता उभे राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे पैलवान मा. श्री. सतीश आबा शिंदे. म्हणूनच त्यांना तुफानातला दिवा असे गौरवोद्गाराने संबोधले जाते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनप्रवासावर, कार्यावर आणि समाजासाठी दिलेल्या योगदानावर थोडासा प्रकाश टाकण्याचा हा प्रयत्न.

सामान्यतेतून असामान्यतेकडे जाणारा प्रवास आष्टी तालुक्यातील चिखली, ता. आष्टी या छोट्याशा गावात जन्म झालेले हे युवक, विचारांनी मात्र नेहमीच व्यापक आणि दूरदृष्टीचे राहिले. परिस्थिती साधी असली तरी स्वप्ने मोठी होती. ही स्वप्ने प्रत्यक्षात उतरवण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी बीपीएड आणि एमपीएड हे उच्च शिक्षण पूर्ण केले. ज्ञान, शिस्त आणि कष्ट यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात लहानपणापासूनच दिसून येतो.



शब्दांकन...
संस्कार लाड (आष्टी)
मो. ८६६८४४८४३३

पैलवानकी ही केवळ शरीर बलकट करणारी कला नसून ती जीवनशिस्त शिकवणारी तपश्चर्या आहे, हा विचार घेऊन २००२ साली 'जय हनुमान तालीम' सुरू करण्यात आली. या तालीमेतून शेकडो युवकांनी केवळ कुस्तीचे धडे घेतले नाहीत, तर आत्मविश्वास, संयम आणि जिद्द यांचेही संस्कार आत्मसात केले.

आज अनेक युवक राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळताना, तसेच शासकीय सेवेत कार्यरत असताना दिसतात, यामागे मा. श्री. सतीश आबा शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन आहे.

समाज घडवताना आर्थिक स्वावलंबन अत्यंत महत्त्वाचे असते, याची जाणीव ठेवून त्यांनी दुग्धव्यवसायाची सुरुवात केली. हा व्यवसाय केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता अनेक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि प्रेरणा देत त्यांनी अनेकांना यशस्वी उद्योजक बनवले. दुग्धव्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे, हे त्यांनी कृतीतून सिद्ध करून दाखवले.

समाजासाठी काम करताना राजकारणाची गरज कधी ना कधी भासते. ही गरज ओळखून मा. श्री. सतीश आबा शिंदे यांनी राजकारणात प्रवेश केला. मात्र हे क्षेत्र संघर्ष, आरोप - प्रत्यारोप आणि वादळांनी भरलेले असते. अनेक संकटे, विरोधकांचे हल्ले आणि अडचणी येऊनही त्यांनी माघार न घेता, हार न मानता आपली वाट चालू ठेवली. भरकटलेल्या युवकांना योग्य दिशा देणे, त्यांच्या अंगातील सुप्त गुणांना वाव देणे आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेच त्यांच्या राजकारणाचे केंद्रबिंदू राहिले.

राजकारण, व्यवसाय आणि पैलवानकी या तिन्ही क्षेत्रांत कार्य करताना त्यांच्या अवतीभोवती अनेक वादळे घोंगावत राहिली. मात्र त्या तुफानातही त्यांनी स्वतःतील दिवा विझू दिला नाही. एकाकी संघर्ष करत, प्रामाणिकपणे काम करत ते टिकून राहिले. हजारो युवकांच्या आयुष्यात प्रकाश पेरणारा हा दिवा आजही तेवत आहे, आणि म्हणूनच समाजाने त्यांना तुफानातला दिवा हे सार्थ नाव दिले आहे.

हजारो युवकांना जीवनाची दिशा देणारे, समाजासाठी अखंड झटणारे, संघर्षातही न डगमगणारे पैलवान मा. श्री. सतीश आबा शिंदे यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिकाधिक सामाजिक कार्य करण्याची ऊर्जा लाभो, हीच महाबली बजरंगबलीच्या चरणी प्रार्थना. तुफानातला हा दिवा असाच अखंड तेवत राहो. दै. समर्थ राजयोग परिवाराकडून वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!

# पै.मा.श्री.सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाची रेलचेल

## दिवसभर रक्तदान शिबिर तर रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

आष्टी /प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष मा. श्री. सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिवसभर रक्तदान शिबिर तर संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सत्कार स्वीकारण्यासाठी दिवसभर घरी तर चारच्या नंतर कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

युवकांना उद्योग व्यवसायाकडे घेऊन जाणारे सर्वांच्या हक्काचे पै. मा. श्री. सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी विविध उपक्रम आयोजित केले जातात, मग उद्योग व्यवसायासाठी मार्गदर्शन असेल, सुशिक्षित युवकांसाठी नोकरीचे महोत्सव असेल तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण इत्यादी उपक्रमाची आयोजन करण्यात येत असते. याही वर्षी असेच आयोजन केले असून रक्तदान शिबिर आणि सांस्कृतिक कार्यक्रम विशेष असणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन योगेश मुटकुळे, अमोल दरेकर, इरफान शेख, श्याम माने, दिगंबर नाना पोकळे, पंडित पोकळे, हनुमंत झगडे, अनिल तावरे, गहीनाथ गाडे, उमेश मुरकुटे, सोपान शिंदे, हरी चंद्रकांत, सपकाळ सांगळे, बंडू पवार, निखिल नरोडे, बाबू दिंडे, सतीश विरकर, राम सांगळे, अण्णासाहेब पोकळे, ज्ञानेश्वर पोकळे, बाळासाहेब पोकळे, अविनाश पोकळे, राम मुटकुळे, प्रवीण श्रीखंडे, संदीप जगदाळे यांच्यासह पै. मा. श्री. सतीश आबा मित्र मंडळ आष्टी - पाटोदा - शिरूर मतदार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

चौकट

वाढदिवस हक्काच्या नेतृत्वाचा

आष्टी - पाटोदा - शिरूर मतदार संघातील युवकांच्या हृदयातील हक्काचं नेतृत्व पै. मा. श्री. सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त युवकांच्या हिताचे उपक्रम दरवर्षी राबवले जातात. याही वर्षी रक्तदान शिबिर व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. दि. ४ जानेवारी २०२६ रोजी पै. मा. श्री. सतीश आबा शिंदे दिवसभर आष्टी येथे उपस्थित असणार आहे.

चौकट

आबा ३६४ दिवस जनतेकडे जातात ; तर जनता हक्काने एक दिवस आबाकडे येते



सर्वसामान्य जनतेच्या हक्काची कामे ३६४ दिवस आबा करतात, सातत्याने जनतेमध्ये मिसळून राहतात आणि त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतात. जनतेप्रति असलेलं मा. श्री. सतीश आबा शिंदे यांचं प्रेम आणि नातं हे आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघातील जनतेने पाहिलं आहे म्हणून तर जनता त्यांच्या वाढदिवसानिमित्त हजारोंच्या संख्येने शुभेच्छा देण्यासाठी आबांकडे एक दिवस येत असते. हाच तो क्षण जो आबांसाठी सर्व जनता हक्काने राखून ठेवत असते, हक्काच्या आबांसाठी हक्काची जनता जमते आष्टी मध्ये, आम्ही येतोय तुम्हीही या अशा पद्धतीचे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

---

बीड पोलीसांच्या आदर्श गणराया स्पर्धेत श्री संस्थान कोरडे गणपतीच्या

# गणेश मित्र मंडळाने पटकावले गणराया अवॉर्ड ,पदाधिकाऱ्यांचा गौरव

प्रतिनिधी । बीड

बीड शहर पोलीस विभागाच्या वतीने आयोजित आदर्श गणराया स्पर्धा २०२५ मध्ये बीड शहरातील काळेगल्ली येथील श्री संस्थान कोरडे गणपतीच्या गणेश मित्र मंडळाने उत्कृष्ट कामगीरी करत द्वितीय क्रमांकाचे गणराय अवॉर्ड पटकावले आहे.

गणेशोत्सवातील आयोजीत स्पर्धेचे पारितोषिक वितरण बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार, पोलीस निरीक्षक शीतल कुमार बल्लाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा



सन्मानचिन्ह प्रदान करून गौरव करण्यात आला.

२०२५ गणेशोत्सवच्या काळात या गणेश मित्र मंडळाने श्रींच्या भव्य व दिव्य आगमन सोहळ्यात शिवकालीन पारंपरिक मर्दानी खेळांचे सादरीकरण करत भाविकांचे लक्ष वेधले होते. उत्सवात मंडळाच्या वतीने बीड येथील पेट शेल्टर फाउंडेशनला भेट देऊन प्राण्यांसाठी मदत मदत, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. गणेश मूर्तीच्या आजूबाजूचा देखावा पर्यावरणपुरक साहित्यापासून तयार करण्यात आला होता. संपूर्ण सजावट मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वत: केली होती. श्रींच्या सन्मानार्थ शहाळे महोत्सव छप्पन्न भोगांची भव्य आरास करण्यात आली होती.

गणेश मंडळाने जपला पारंपारीक वारसा

बीड शहरात लोकमान्य टिळकांच्या आदर्शांवर चालत हे गणेश मंडळ प्रत्येक वर्षी पारंपारीक गणेशोत्सव साजरा करत आहे. कोणतीही स्पर्धा किंवा अहंकार न ठेवता, शांततेत आणि उत्साहात समाजहित जपत पुढे जाणारे हे गणेश मंडळ भाविकांच्या दृष्टीने कौतुकास्पद ठरले आहे.

# ध्येय निश्चितीसाठी पुस्तके आणि समाज माध्यमाचा वापर करा – स.पो.नि. लता पगलवाड

धर्माबाद / अशोक पडोळे

हुतात्मा पानसरे हायस्कूल येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून बालिका दिन साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव विश्वनाथ पाटील बनाळीकर प्रमुख पाहुणे धर्माबाद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लता पगलवाड हे होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रभारी मुख्याध्यापिका सौ ज्योती पडग लवार, सूत्रसंचालन सौ. मंडलिक यांनी केले.



शाळेतील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी कुमारी सृष्टी गाडे कु. कोंडुरे तसेच शाळेतील शिक्षिका सौ.तिमापुरे ३ जानेवारी हा दिवस तळागाळातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी बालिका दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. मुली - मु मुक्त विचारांची जोपासना, ल - लढवया मुली , गीत संस्कृतीचे संवर्धन सावित्रीबाईच्या मुलींची व्याख्या सांगितले. पण नंतर धर्माबाद पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक लता पगलवाड यांनी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात ध्येयनिश्चितीसाठी पुस्तके व समाज माध्यमाचा वापर करा बालिकांचा उत्साह वाढवण्यासाठी जीवनात ध्येय शिक्षणाची गरज आहे.आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषाबरोबर स्त्रिया शिक्षण, आरोग्य वेगवेगळ्या क्षेत्रात काम करत आहेत. विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रात मोबाईलचा वापर कमी करून पुस्तकी ज्ञान अधिक अवगत करावे. शालेय जीवन शिक्षण घेत असताना स्वावलंबी जीवन जगत असताना मोबाईलचा वापर कमी करा. इयत्ता आठवीच्या मुलांनी मोठ्या मुलांची अनुकरण करून आई-वडिलांना मोबाईलसाठी हट्ट धरू नये. स्वतः ध्येय ठरवून सावित्रीच्या लेकी स्वावलंबी जीवन साठी प्रयत्न करावे मुला मुलींनी समाज वावरत असताना जीवनाचे ध्येय समोर ठेवून शिक्षण आत्मसात करावे असे आवाहन केले. अध्यक्ष विश्वनाथ पाटील बनाळीकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. आभार प्रदर्शन मुजळगे मॅडम यांनी केले.

# असलम डफेदार यांना पीएच.डी. पदवी

बिदर / अशोक गुरनाळे

भालकी तालुक्यातील मेथी-मेळकुंदा येथील शेतकरी कुटुंबातील श्री. इसाकसाब अजमोद्दीन डफेदार यांचे चिरंजीव श्री. असलम इसाकसाब डफेदार यांनी शिवमोग्गा (कर्नाटक) येथील केलडी शिवप्पा नायक कृषी व फलोत्पादन विज्ञान विद्यापीठाअंतर्गत किटकशास्त्र विषयात संशोधन पूर्ण करून डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) ही पदवी प्राप्त केली आहे.



सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात त्यांनी पीएच.डी. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला असून, विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यास संचालनालयामार्फत त्यांना तात्पुरते पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.संशोधन कालावधीत त्यांनी किटकशास्त्र विषयातील विविध महत्त्वपूर्ण घटकांवर सखोल व अभ्यासपूर्ण संशोधन केले. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल मार्गदर्शक प्राध्यापक, सहकारी, मित्रपरिवार तसेच नातेवाइकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# श्रीमती शोभा दळवी यांना बीड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते प्रदान



बीड /प्रतिनिधी

जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ यंदा गेवराई तालुक्यातील कर्तव्यनिष्ठ शिक्षिका श्रीम. शोभा सुरेश दळवी मॅडम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रसुलाबाद यांना जाहीर करण्यात आला. सदरील पुरस्कार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

१ जानेवारी २०२५ रोजी बीड येथे पार पडलेल्या भव्यसमारंभात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते हा सन्मान सौ. शोभा दळवी मॅडमला प्रदान करण्यात आला. सध्या श्रीम. दळवी मॅडम या जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उमापुर येथे कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने व प्रामाणिकपणे विविध उपक्रम श्रीमती शोभा दळवी मॅडमने राबवले आहेत. आयडॉल शिक्षिका म्हणून देखील मॅडमची यावर्षी निवड झाली आहे. साहित्य निर्मिती, तंत्रस्नेही शिक्षण, नवोपक्रम,आनंददायी शिक्षण, प्रयोग,इंग्लिश ऍक्टिव्हिटी, स्पर्धा परीक्षा,लोकसहभाग इत्यादी अनेक उल्लेखनीय कार्य मॅडमचे आहे. आज पर्यंत चकलंबा केंद्रातील प्रा. शा. कासारवाडी व प्रा. शा. रसुलाबाद येथील मॅडमचे कार्य उत्कृष्ट असल्याने व पुरस्कार प्राप्त झाल्याने मॅडमचे तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक,शिक्षक,व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य, सरपंच यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर खासदार बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस,आ.प्रकाश सोळंके,आ. विजयसिंह पंडित,आ. संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,मुख्य कार्यकारी अधिकारी जितेन रहेमान, शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर शिक्षणाधिकारी (मा.)प्रियाराणी पाटील व सर्व सन्माननीय यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण झाले. आदर्श शिक्षिका सौ.शोभा दळवी यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समिती व राजगीर बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने

# भीमा कोरेगाव शौर्य विजयी दिनानिमित्त नवनिर्वाचित नगराध्यक्ष नगरसेवक यांचा सत्कार

धाराशिव /प्रतिनिधी

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त व भीमा कोरेगाव शौर्य विजयी दिनानिमित्त फुले शाहू आंबेडकर सेवा भावी संस्था धाराशिव संचलित फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समिती व राजगीर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने धाराशिव शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचा म्हणजेच नगराध्यक्ष नगरसेवक व नगरसेविका यांचा सत्कार फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या नियोजित जागेत करण्यात आला.

कार्यक्रमापुर्वी तथागत गौतम बुद्ध यांच्या मुर्तीस पुष्प अर्पण करुन बुद्ध वंदना घेण्यात आली,शाल, सन्मान पत्र, भारतीय संविधान उद्देशिका विश्लेषण प्रत, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील संसद मधील भाषण असलेले पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. प्रस्तावनेत अध्यक्ष गणेश वाघमारे यांनी फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने घेण्यात येणारे कार्यक्रम तसेच जागेच्या हस्तांतरण आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सांस्कृतिक सभागृहाविषयी माहिती दिली.

नगर सेवक राहुल काकडे,नगर सेवक अमित भैया शिंदे,नाना घाडगे यासह इतर ही मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त केले.यावेळी समितीचे अध्यक्ष गणेश वाघमारे, सचिव प्रवीण जगताप,उपाध्यक्ष संजय गजधने,कोषाध्यक्ष अंकुश उबाळे,बलभीम कांबळे,धनंजय वाघमारे,बाबासाहेब बनसोडे,राणा बनसोडे,सचिन



चौधरी,बाबासाहेब गुळीग,लक्ष्मण माने,स्वराज जानराव, विशाल घरबुडवे,श्रीकांत मटकिवाले,अतुल लष्करे, गुणवंत सोनवणे,राजगीर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नागनाथ गोरसे,ड.अनुरथ नागटिळक बापु कुचेकर,नवनाथ वाघमारे,मेजर सिद्राम वाघमारे, राजेंद्र धावारे,अशोक बनसोडे,पांडुरंग आल्टे,सुनिल वाघमारे,नरेन वाघमारे, मुकेश मोटे,योध्दा सामाजिक संस्थेचे सरफराज पटेल,बाबा कांबळे तर विजयी उमेदवार

# ग्लोबल प्री-प्रायमरी आणि शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलमध्ये 'सावित्रीबाई फुले' यांची जयंती साजरी



बीड /प्रतिनिधी

ग्लोबल प्री-प्रायमरी आणि शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल,पांगरी रोड,बीड या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेतील मराठी विषयाच्या शिक्षिका सौ.शितल घोलप मॅडम लाभल्या.तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेतील हिंदी विषयाच्या शिक्षिका सौ.ज्योती मेटे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या आरंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला मानवंदना देण्यात आली.

या कार्यक्रमात इयत्ता सहावी ते दहावीतील विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. अतिशय खडतर परिस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले स्वतः शिकल्या आणि इतर महिलांना सुशिक्षित केले हा अभिप्राय व्यक्त केला. जर एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब सुशिक्षित आणि सक्षम होते हा विचार त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजवला.या कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे प्राचार्य श्री.अनिल जोशी सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षक श्री.महेश वैद्य सर,सौ.रेवती कुलकर्णी मॅडम आणि कुमारी रोमिलीना रेड्डी मॅडम यांनी केले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका सौ.अश्विनी सुपेकर मॅडम यांनी केले. तसेच या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका सौ.रोहिणी सुपेकर मॅडम यांनी केले.याप्रसंगी शिक्षण संस्थेचे संचालक श्री.बी.बी.जाधव सर (सनदी लेखापाल ), प्रा.मदनरावजी जाधव सर, श्री.संजयजी पवार सर, सौ. वैशालीताई जाधव मॅडम, शाळेचे प्राचार्य श्री.अनिल जोशी सर यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या परळी तालुकाध्यक्षपदी प्रल्हाद कंडूकटले तर शहराध्यक्षपदी रंगनाथ सावजी यांची एकमताने निवड

## कार्याध्यक्षपदी सुमित गिरी, उपाध्यक्षपदी अरुण सपाटे तर सचिवपदी मोहन चव्हाण


परळी /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या बीड जिल्हा शाखे अंतर्गत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या परळी तालुकाध्यक्षपदी प्रल्हाद कंडुकटले यांची तर शहराध्यक्षपदी रंगनाथ सावजी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

पत्रकार संघाची आज शासकीय विश्राम गृह येथे दैनिक दिव्यअग्निचे मुख्यसंपादक तथा जेष्ठ मार्गदर्शक प्रकाशजी सुर्यकर यांच्या अध्यक्षतेखाली व दैनिक महाराष्ट्र प्रतिमाचे संपादक ज्ञानोबा सुरवसे यांच्या प्रमुख उपस्थीतीत पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत नुतन कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. ती पुढील प्रमाणे तालुकाध्यक्ष प्रल्हाद कंडुकटले (दैनिक हिंद जागृती), कार्याध्यक्ष सुमित गिरी (दैनिक बीडसत्ता),







उपाध्यक्ष अरूण सपाटे (परळीचा आवाज), सचिव मोहन चव्हाण (दै.युवा मराठा) सदस्य समीर ईनामदार (दै.युवाशक्ती), संतोष बारटक्के अंबजोगाई टाईम्स, विद्याधर सिरसाट परळी वार्ता, अनिरूध्द जोशी मुक्त पत्रकार, धनंजय माने मुक्त पत्रकार, प्रकश वर्मा दै.लोकतंज्ञ, नितीन जाधव (बीड नगरी), आकाश सोनी (न्याय टाईम्स), पवन माने (जनशक्ती) शिवराम जाधव (विश्वनायक), अनंत हडबे (मराठवाडा साथी), दत्ता शिवगण (परळी नगरी), तर सल्लागार जी.एस.सोंदळे (वैद्यनाथ टाईम्स), बाबुराव दहिभाते (महाराष्ट्र प्रतिमा), बालासाहेब कडबाने दैनिक जगमित्र, राजेश साबणे (दैनिक परळी प्रहार), भगीरथ बद्दर (पोलखोल), शिरिष सोलपुरे (त्रिशुल), बालासाहेब जगतकर (मानपत्र), हनुमान मगर (क्रांतीकारी साथी), राजकुमार कदम (मराठवाडा नेता) आदींची निवड करण्यात आली आहे. लवकर परळी शहरातील भव्य दिव्य दर्पण दिन साजरा करण्यात येईल

# गेवराई नगर परिषद अध्यक्ष सौ. गीता त्रिंबक पवार यांच्या विरोधात अपात्रतेसाठी याचिका दाखल:-ॲड. चंद्रकांत ठोंबरे

गेवराई(प्रतिनिधी) :-अलीकडे झालेल्या नगर परिषद निवडणुकीत सौ. गीता त्रिंबक पवार या गेवराई नगर परिषदेच्या नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत. मात्र, त्यांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे गेवराई शहरातील सर्वे नं. ५८, ५९ व ६१ या सरकारी मालकीच्या जागांवर सन २०१३ पासून बेकायदेशीर अतिक्रमण असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

सदर जागा लक्ष्मण पवार, सौ. गीता पवार व कै. माधवराव पवार यांच्या ताब्यात असून, या अतिक्रमणाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून नगराध्यक्ष पदाचा गैरवापर होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, सन २०१३ पासून सौ. गीता पवार नगरसेविका आणि लक्ष्मण पवार आमदार असताना सरकारी जागेवर बेकायदेशीर बांधकाम व अतिक्रमण



करण्यात आल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

या संदर्भात जनहित याचिका क्र. १४६/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट आदेश दिले असतानाही अद्याप अतिक्रमण हटवण्यात आलेले नाही. उलट, पवार कुटुंबीय सदर जागेचा बेकायदेशीररीत्या भाडे वसूल करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, गेवराई शहर व तालुक्यातील नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासाठी १३,००० चौ. फूट जागेची मागणी केली होती. सदर जागेसाठी शासनाने नाहरकत प्रमाणपत्र दिले असतानाही पवार कुटुंबीयांनी स्मारक उभारणीस अडथळा निर्माण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या सर्व बाबी लक्षात घेता, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष ॲड. संजय काशीनाथराव काळे यांनी महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत आणि औद्योगिक टाउनशिप कायदा, १९६५ मधील कलम ४४(२) अन्वये सौ. गीता त्रिंबक पवार यांच्या नगराध्यक्ष पदाच्या अपात्रतेसाठी मा. जिल्हाधिकारी न्यायालय, बीड यांच्यासमोर अपात्रतेची याचिका दाखल केली आहे.सदर याचिका ॲड. चंद्रकांत ठोंबरे, उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दाखल केली आहे.




# उपनगराध्यक्षपदी माबुद कुरेशी यांना संधी देण्याची मुस्लिम समाची मागंणी

जिंतूर ( प्रतिनिधी)

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी गेली २५ वर्षे प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या उच्च शिक्षित व निष्ठावंत कार्यकत्यांस उपनगराध्यक्षपदाची जवाबदारी देण्यात यावी अशी जोरदार मागणी मुस्लिम समाजाच्या नागरिकांकडून व भाजप कार्यकर्त्यांकडून होत आहे. ही मागणी माबूद कुरेशी यांनी पक्षश्रेष्ठींकडे मांडली असून त्याला उपनगर अध्यक्ष पदासाठी नागरिकांसह कार्यकत्यांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.भाजप हा शिस्तबद्ध व कार्यकर्त्तांना संधी देणारा पक्षअसून, ज्या कार्यकत्यांनी कठीण काळातही पक्षाची धुरा खांद्यावर घेतली, अशा अनुभवी व निष्ठावंत कार्यकर्त्यांचा सन्मान होणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कुरेशी यांनी सांगितले की, पक्षासाठी निस्वार्थपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना योग्य पदे मिळाल्यास कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढते, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाला अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला, ही मागणी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहोचवण्यात आली असून, लवकरच यावर सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ग्रामीण भागातील ९वी व १० वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केल्या स्वतःच्या वेबसाईट्स

## लातूर जिल्ह्यात डिजिटल शिक्षणाची नवी सुरुवात

लातूर(म.मुस्लिम कबीर )जिल्ह्यातील औसा तालुक्यातील श्री गणेश विद्यालय, उजनी (ता. औसा, जि. लातूर) येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी डिजिटल शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत स्वतःच्या वेबसाईट्स तयार केल्या आहेत.

१.५ GB - Online Learning Platform(www.gbstudy.in) या Ed-Tech कंपनी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेब डेव्हलपमेंट व आधुनिक AI-आधारित कोडिंगचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सार्थक वाघमारे, अमृता



वाघमारे आणि इराम रुईकर या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण करून स्वतःचे प्रोजेक्ट यशस्वीरीत्या सादर केले.

अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना शाळेतच प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक कोपरकर सर, पर्यवेक्षक ठाकूर सर तसेच विज्ञान शिक्षक टापरे सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा आधुनिक शिक्षण उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली.

या प्रसंगी १.५ GB - Online Learning Platform चे संस्थापक मोहम्मद पांजेशा व आरेफ मन्यारी यांनी सांगितले की,

आज जगातील अनेक प्रगत देशांमध्ये पहिलीपासूनच कोडिंग आणि एआय शिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. आमचे उद्दिष्ट लातूर जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच दर्जाचे आधुनिक, एआय-आधारित आणि कौशल्याधिष्ठित शिक्षण उपलब्ध करून देणे आहे. यासाठी शासनाची साथ आणि मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे.

# भगवानगडावर श्री संत भगवानबाबांच्या पुण्यतिथीची जय्यत तयारी

अहिल्यानगर (प्रशांत बाफना) : महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी सोहळ्याची भव्य तयारी श्री क्षेत्र भगवानगडावर सुरू झाली आहे. रविवार, दि. ४ जानेवारी रोजी पुण्यतिथी साजरी होत असून, यानिमित्ताने गडावर भव्य मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

भाविकांसाठी सुमारे शंभर क्विंटल साखरेपासून महाप्रसाद तयार केला जाणार आहे. लाखो भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र व सुयोग्य पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून, या व्यवस्थेसाठी पोलीस प्रशासनासह घोगस पारगांव व भारजवाडी येथील तरुणांवर विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

पुण्यतिथी निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध संस्थानांहून तसेच गावोगावाहून लहान-मोठ्या अनेक दिंड्या श्री क्षेत्र भगवानगडावर दाखल






होत आहेत. सर्व कार्यक्रमांचे नियोजन व देखरेख मठाधिपती ह.भ.प. न्यायाचार्य डॉ. श्री. नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत काटेकोरपणे करण्यात येत आहे.रविवारी सकाळी ९ वाजता श्री संत भगवानबाबांच्या समाधीची महापूजा होणार आहे. दुपारी १२ वाजता काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसाद वाटप करून पुण्यतिथी सोहळ्याची सांगता होईल.

विशेष आकर्षण - महंत शास्त्रीजींचे कीर्तन

श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती तथा वारकरी संप्रदायाचे भूषण ह.भ.प. न्यायाचार्य श्री. नामदेव महाराज शास्त्रीजी यांचे कीर्तन म्हणजे वारकरी व रसिकांसाठी पर्वणीच असते. श्री संत भगवानबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्ताने रविवारी त्यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, सर्व भाविक-भक्तांनी वेळेवर श्री क्षेत्र भगवानगडावर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पोलीस प्रशासनाला तरुणांचे सहकार्य

पुण्यतिथी सोहळयासाठी जमणाऱ्या लाखो भाविकांच्या वाहनांची पार्किंग व्यवस्था, महिलांची सुरक्षितता, संभाव्य चोऱ्या रोखणे व इतर नियोजनबद्ध व्यवस्थापनासाठी घोगस पारगांव व भारजवाडी येथील तरुण पोलीस प्रशासनाला सक्रिय सहकार्य करणार आहेत

# द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूल, गेवराई येथे वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न



गेवराई (प्रतिनिधी) द केंब्रिज व्हॅली इंटरनॅशनल स्कूल गेवराई येथे शैक्षणिक वर्ष २०२५ चा दि.३१ डिसेंबर रोजी वार्षिक क्रीडा महोत्सव सात दिवसांच्या कालावधीत मोठ्या उत्साहात शिस्तबद्ध व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करणे शारीरिक तंदुरुस्ती वाढवणे तसेच संघभावना, नेतृत्वगुण व शिस्त या मूल्यांचा विकास घडवून आणणे हा या क्रीडा महोत्सवाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण व क्रीडाज्योत प्रज्वलन करून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध हाऊसचे प्रतिनिधित्व करत शिस्तबद्ध मार्च-पास्ट सादर केला, ज्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.या क्रीडा महोत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर क्रीडा समन्वयक बापूसाहेब तारूकर, पत्रकार प्रतीक कांबळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर,जेष्ट पत्रकार आय्युब बागवान,पत्रकार तथा ड.हारुण शेख, संचालक सौ.डॉ.वर्षा मोटे, सचिव डॉ.बी.आर.मोटे, प्रचार्य प्रमोद सर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी अंतिम सामन्यात क्रीडा महोत्सवांतर्गत कबड्डी, खो-खो, क्रिकेट, हॅन्डबॉल, व्हॉलीबॉल, धावणे अशा विविध मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वेगवेगळ्या वयोगटातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली क्रीडा कौशल्ये व चिकाटी सादर केली. अनेक स्पर्धांमध्ये अटीतटीचे सामने पाहायला मिळाले, ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.विशेष आकर्षण ठरले ते पालकांसाठी आयोजित करण्यात आलेले मनोरंजनात्मक व सहभागात्मक खेळ. या उपक्रमामुळे शाळा-पालक संवाद अधिक दृढ झाला असून पालकांनीही मोठ्या आनंदाने सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी स्पर्धांतील विजेत्या व सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते चषक, पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. महोत्सव यशस्वी होण्यासाठी शारीरिक शिक्षण शिक्षक शुभम कादे व अक्षय इंगळे सर व सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी अधिक परिश्रम घेतले

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# नगराध्यक्ष मुंदडांच्या पदभाराची जय्यत तयारी : उपनगराध्यक्ष कोण होणार ? अंबाजोगाई नगरपरिषदेत सत्तासंघर्ष

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचा पदभार सोमवारी नंदकिशोर मुंदडा घेणार आहेत. या पदभार सोहळ्यासाठी भाजप समर्थकांनी जय्यत तयारी सुरु केली असून नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांची भव्य मिरवणूक शहरातून काढण्यात येणार आहे. या मिरवणूकीत ठिकठिकाणी विजयी झालेल्या नगरसेवकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक प्रभागात स्वागताच्या तयारीसाठी कमिट्याही जाहीर करण्यात आल्या आहेत. एकंदरीत भाजप समर्थक या पदभार सोहळ्याला 'ग्रॅन्ड इव्हेंट' बनवणार असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

अंबाजोगाई नगरपरिषदेची निवडणूक नुकतीच पार पडली असून अंबाजोगाईकरांनी नगराध्यक्षपदाचा कौल नंदकिशोर मुंदडांच्या पारड्यात टाकला आहे. त्यामुळे मुंदडांच्या कार्यकर्त्यांत मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून येत आहे. पदभार स्वीकारण्याअगोदर नगराध्यक्षांच्या दालनाची रंगरंगोटी आणि लिफ्टचीही सेवा सुरु करण्यात येत आहे. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन समर्थक पदभार स्वीकारण्याची जोरदार तयारी करताना दिसून येत आहेत.

दरम्यान, नगरपरिषदेची सर्वसाधारण बैठकही येत्या काळात पार पडणार असून या बैठकीत उपनगराध्यक्ष तसेच स्वीकृत सदस्यांची निवड होणार आहे. नियमानुसार लोकविकास महाआघाडीच्या वाट्याला दोन, तर अंबाजोगाई परिवर्तन जनविकास आघाडीच्या वाट्याला एक स्वीकृत सदस्य मिळणार आहे. नगरपरिषदेत लोकविकास महाआघाडीचे स्पष्ट बहुमत असल्याने उपनगराध्यक्षपद



त्यांच्या वाट्याला जाण्याची दाट शक्यता आहे. लोकविकास महाआघाडीचे नेतृत्व राजकिशोर मोदी करत असल्याने उपनगराध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार आणि स्वीकृत सदस्य म्हणून कोणाला संधी दिली जाणार, याकडे अंबाजोगाईकरांचे लक्ष लागले आहे. आगामी बैठकीत होणाऱ्या निर्णयांकडे सर्वांचेच लक्ष केंद्रित झाले आहे.

नवनिर्वाचित नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांच्या पदभाराची जशी चर्चा अंबाजोगाईत सुरु आहे, तशीच चर्चा उपनगराध्यक्ष पदाच्या बाबतीत सुरु आहे. उपनगराध्यक्षपदी लोकविकास महाआघाडीचाचं नगरसेवक विराजमान होईल आणि नगरपरिषदेच्या सत्तेची दुसरी चावी आपल्याकडेचं राहिल याची दक्षता आघाडीचे प्रमुख नेते घेत आहेत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात चर्चिली जात आहे.

स्वीकृत सदस्यांत मोदी, लोमटे आघाडीवर : नगरपरिषदेत सत्तासंघर्ष

लोकविकास महाआघाडीला नगरपरिषदेत स्पष्ट बहुमत प्राप्त झाल्याने त्यांना दोन स्वीकृत नगरसेवक मिळणार आहेत. या स्वीकृत सदस्यांच्या निवडीत माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी आणि माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे यांची नावे आघाडीवर असल्याची माहिती समोर येत आहे. दोन्ही नेते अनुभवी आणि प्रभावी असल्याने त्यांच्या निवडीमुळे नगरपरिषदेत राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीमुळे महाआघाडीची ताकद अधिक वाढणार असून, सत्ताधारी व विरोधकांमध्ये जोरदार राजकीय हालचाली सुरू होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे येत्या काळात नगरपरिषदेत निर्णयप्रक्रिया, सत्ता संतुलन आणि राजकीय संघर्ष अधिक तीव्र स्वरूपात पाहायला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# सादोळ्यासह गोदावरी नदीकाठावर मोटारींचे वायर चोरांचा सुळसुळाट

- ग्रामीण पोलिसांनी वायर चोरट्यांच्या मुसक्या आवळाव्यात
- उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांची मागणी

माजलगाव /प्रतिनिधी: तालुक्यातील सादोळा, आबुजवाडी या गावासह गोदावरी नदीकाठच्या परिसरातील शेकडो शेतक-यांच्या पाणी उपसा करणा-या मोटारींवरील कॉपर वायर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली असुन या चोरट्यांवर कारवाई करून त्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी भावी जि. प. सदस्य तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी ग्रामीण पोलिस प्रशासनाकडे केली आहे.

गोदाकाठी शेती असलेल्या शेतक-यांनी पाणी वाहुन नेण्यासाठी मोटरी बसविल्या असून, प्रत्येक मोटारीसाठी स्टार्टरपासुन १०० ते ३०० फुट लांबीचे वायर वापरले जाते. दहा एचपी पेक्षा क्षमतेच्या मोटारीसाठी हे वायर दुहेरी प्रमाणात असतात. परंतु अज्ञात चोरट्यांनी हे वायर तोडुन नेले आहे. त्यामुळे शेकडो शेतक-यांचे हजारो फुट वायर चोरीला गेल्याने लाखो रूपयाचे



नुकसान झाले आहे. परिणामी अनेक शेतक-यांच्या मोटारी बंद पडुन शेतीच्या सिंचनाचा प्रश्न गंभिर झाला आहे. त्यामुळे दोषी आरोपींना अटक करून त्यांच्याकडुन नुकसान भरपाई वसूल करावी आणि कडक शिक्षा द्यावी व शेतक-यांचे होणारे नुकसान टाळावे अशी मागणी जि. प. सदस्य तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी ग्रामीण पोलिस प्रशासनाकडे केली आहे.

# श्याम विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक नवनाथ पाळवदे सर यांचा भावपूर्ण निरोप समारंभ संपन्न

केज/प्रतिनिधी

श्याम विद्यालयाचे ज्येष्ठ व आदर्शशिक्षक श्री.नवनाथ पाळवदे सर यांच्या सेवापुर्ती निमित्ताने श्याम विद्यालय,शाम कनिष्ठ महाविद्यालय व शाम गदळे कला,विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सपत्नीक गौरवपूर्ण सत्कार करून भावपूर्ण निरोप देण्यात आला.या निरोप समारंभास संस्थेचे मार्गदर्शक सखाहरी तात्या गदळे,प्राचार्या सौ. जयश्री शरद गदळे,संकेत पाळवदे,मुख्याध्यापक अनंतराव सारूक सर, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डोईफोडे सर यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची सुरुवात केली.यानंतर विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत पाळवदे सरांच्या प्रदीर्घ, निष्ठावंत व आदर्श सेवा



कार्याचा गौरव केला.

यावेळी ठोंबरे सर,डी.बी. भालेराव सर,बी.एस.मुंडे सर,भोसले सर यांनी आपल्या मनोगतातून पाळवदे सर हे शिस्तप्रिय, विद्यार्थी प्रिय व सहकाऱ्यांना सदैव प्रेरणा देणारे शिक्षक असल्याचे सांगितले.त्यांच्या अध्यापन पद्धतीमुळे असंख्य विद्यार्थी घडले असल्याचेही वक्त्यांनी नमूद केले.प्राचार्या सौ. जयश्री शरद गदळे यांनी सविस्तर मनोगतात पाळवदे सरांचे शैक्षणिक, सामाजिक व नैतिक योगदान अधोरेखित करत त्यांच्या पुढील आयुष्या साठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात सखाहरी तात्या गदळे यांनी पाळवदे सरांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले.संस्थेच्या जडणघडणीत पाळवदे सरांचा मोलाचा वाटा असून त्यांची सेवा ही पुढील पिढीसाठी प्रेरणादायी आहे,असे त्यांनी सांगितले.

सत्कारास उत्तर देताना श्री.नवनाथ पाळवदे सर यांनी आपल्या भावना व्यक्त करत संस्थेने, सहकाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.शिक्षकी पेशा ही केवळ नोकरी नसून समाज घडवण्याची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी नागरगोजे बंडू सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.संपूर्ण कार्यक्रम अत्यंत भावनिक वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देश महासत्ता होण्यासाठी तरुणांनी उद्योग व्यवसायाकडे वळावे

- अभय कोकड
- सिद्धेश्वर महाविद्यालयात उद्योजकता विकास कार्यशाळेचेउदघाटन

माजलगाव (प्रतिनिधी) :देश महासत्ता होण्यासाठी तरुणांनी उद्योग व्यवसायाकडे वळावे असे प्रतिपादन सिद्धेश्वर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता विकास कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे तर महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अमृत पुणे चे जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी, जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर उपस्थित होते. पुढे बोलताना अभय कोकड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विद्यार्थी



जीवनापासूनच स्वतःचा छोटा मोठा लघुउद्योग सुरू करावयास हवा ज्या माध्यमातून आपल्याला अर्थप्राप्ती होऊ शकते. त्यासोबतच सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून आपल्या उत्पादनाचे प्रभावी मार्केटिंग हे केले पाहिजे. विशाल जोशी म्हणाले की, शासनाने विद्यार्थ्यांच्या भविष्यात उद्योग व्यवसायासाठी सारथी भारती महाज्योती अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ यांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराचे विविध साधने निर्माण केले आहे. दुसऱ्या सत्रामध्ये दत्तात्रय क्षीरसागर म्हणाले की, आपण आपल्या उद्योगातूनच आपली सामाजिक प्रतिष्ठा निर्माण करू शकतो. नोकरीच्या पाठीमागे न लागता छोटे-मोठे उद्योग जर तुम्ही आता सुरू केले तर भविष्यात तो तुमचा उद्योग तुम्हाला नक्कीच पैसा व प्रतिष्ठा मिळवून देईल. मार्केटिंग, संवाद कौशल्य, आपण जर आत्मसात केली तर आपल्याला मोठ्या प्रमाणात बँका भांडवल उपलब्ध करून देतील.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, छोटे छोटे कौशल्यातून देखील तुम्ही स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकता. रांगोळी, मेहंदी, फुलांची ज्वेलरी तयार करणे यासारख्या छोट्या उद्योगातून देखील तुम्हाला भरपूर प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळू शकते. प्रास्ताविक संयोजक डॉ. महेश देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार संयोजक प्रा. अशोक होके यांनी मानले. कार्यशाळेसाठी उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, प्रा.प्रवीण गिल्डा, प्रा. अभय येवतेकर, प्रा. नामदेव हेडे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले जयंती निमित्त मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये भव्य कार्यक्रम

मानूर प्रतिनिधी ह्व

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मॉडर्न इंग्लिश स्कूल, शिरूर कासार येथे अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महिलाशिक्षण, समाजप्रबोधन आणि समानतेच्या विचारांचा जागर करणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसह पालकवर्गासाठी मार्गदर्शक ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरूरच्या आरोग्य अधिकारी डॉ. मृणाली घुगे उपस्थित होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेत महिलांनी शिक्षण, आरोग्य व सामाजिक क्षेत्रात पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. आरोग्य व शिक्षण या दोन्ही क्षेत्रांचा समाजउन्नतीत असलेला महत्त्वपूर्ण वाटा त्यांनी स्पष्ट केला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून मुख्याध्यापिका रंजना फुंदे उपस्थित होत्या. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी अंगीकारावी, शिक्षणातूनच समाजपरिवर्तन शक्य आहे, असे प्रतिपादन केले. विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने पुढे जावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला पोलीस कर्मचारी सोनाली चौरे, पत्रकार गोकुळ पवार व मनोज परदेशी यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मनोगतातून सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी शिस्त, कर्तव्यनिष्ठा व सामाजिक बांधिलकी जपावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, कविता व सांस्कृतिक सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रमाला बहुसंख्य मातापालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडले. शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मॉडर्न इंग्लिश स्कूल चे मुख्याध्यापक माही सर यांनी कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी शाळेच्या सर्व शिक्षिका, इतर स्टाफ आणि पालक उपस्थित होते...






# आधुनिक शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले- प्रा. स्वाती साखरे

माजलगाव (प्रतिनिधी) :सावित्रीबाई फुले म्हणजे आधुनिक शिक्षणाची जननी होत्या असे प्रतिपादन प्रा. स्वाती साखरे यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात अभ्यास मंडळाच्या वतीने आयोजित सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी मुलींना शिक्षणाचा अधिकार प्राप्त करून दिला. आपले पती ज्योतीराव फुले यांच्या मदतीने १८४८ साली पुण्यातील भिडेवाडा येथे पहिली मुलींची शाळा त्यांनी सुरू केली. एका दलित कुटुंबात जन्मलेल्या सावित्रीबाई यांना समाजात शिक्षण घेत असताना खूप त्रास सहन करावा लागला परंतु तो त्रास जरी सहन करावा लागत असेल तरी समाजासाठी मी हे पत्करायला तयार आहे अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच त्यांना लोक आज क्रांतीज्योती व ज्ञानज्योती असे संबोधतात. त्या देशातील पहिल्या महिला शिक्षिका व मुख्याध्यापिका होत्या.प्रास्ताविक स्टाफ अकॅडमीचे प्रमुख प्रा. नामदेव हेडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जिजाराम बागल यांनी केले तर आभार प्रा. दिनेश गडदे आणि मानले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, डॉ. प्रेमनंदा घडसिंग, प्रा. प्रतिभा जाधव, प्रा. सुवर्ण पांचाळ, कार्यालय अधीक्षक उत्तरेश्वर अनेवार तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल गंगाई- बाबाजी राज्यस्तरीय पुरस्काराने भागवत मसने सन्मानित

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय गंगाई- बाबाजी राज्यस्तरीय पुरस्कार २०२५-२०२६ ने अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध कवि, वात्रटिकाकार भागवत रामकृष्ण याना त्यांच्या साहीत्य क्षेत्रातील योगदानाबद्दल नुकतेच १ जानेवारी २०२६ रोजी आष्टी येथे मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानीत करण्यात आले. गंगाई बाबाजी पुरस्कार हा प्रतिवर्षी साहित्य, शैक्षणिक, सामाजिक तसेच कृषी व क्रीडा क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तीस दिला जातो . त्यामुळे या पुरस्काराची वेगळी अशी ओळख व प्रतिष्ठा निर्माण झाली आहे. या प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे हे पुरस्कार देण्यासाठी व्यक्ती निवडताना अतिशय तावून सलाखून त्यांची निवड करताना आढळून येतात.

अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी नूतन विद्यालयात सहशिक्षक म्हणून कार्यरत असणारे भागवत मसने हे गेल्या पंचवीस वर्षापासून साहित्यातला व्यंग, वात्रटिका प्रकार हाताळतात. शाळा, महाविद्यालयातून ते सातत्याने वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना हसवण्याचे काम करत आले आहेत. मनोरंजनातून शिक्षण व प्रबोधन हे त्यांच्या कवितेचा गाभा आहे. त्यांनी अनेक स्नेहसंमेलन, राष्ट्रीय सेवा योजना तसेच विविध कार्यक्रमातून प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून सामाजिक प्रबोधन करण्याचे कार्य केले आहे. मोबाईल सारखे भौतिक साधन वापरत असताना विद्यार्थ्यांनी, समाजाने सामाजिक भान ठेवलं पाहिजे. अशा विविध सामाजिक समस्यांना हाताळत ते मनोरंजनातून प्रबोधन करतात. एक उत्तम सूत्रसंचालक असून अनेक कवी संमेलने अनेक राजकीय सभा यांचे सूत्रसंचालन उत्तम आणि बहारदार करतात. या व अशा अन्य कार्याची दखल घेऊन गंगाई -बाबाजी पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली. दिनांक एक जानेवारी २०२६ रोजी भगवान महाविद्यालय आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार प्रदान सोहळ्याप्रसंगी भागवत मसने यांच्या सोबत श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार प्रा. माणिकराव लोंमटे, जय हिंद ग्रुपचे अध्यक्ष मेजर प्रा एस. पी. कुलकर्णी व श्री योगेश्वरी नूतन विद्यालय मंदिर विभाग प्रमुख एस.बी. शिंदे यांच्यासह मसने यांचे कुटुंबीय तथा मित्र परिवार मोठ्या प्रमाणावर सहभागी झाला होता.भागवत मसने यांना यापूर्वी अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ज्यामध्ये साहित्य, शैक्षणिक व सामाजिक पुरस्काराचा समावेश आहे.कोल्हापूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय सन्मान, शिवजागर प्रतिष्ठाण चा महाराष्ट्र रत्न पुरस्कार, मैत्री फाउंडेशन बीडचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, तसेच आदर्श साहित्यिक पुरस्कार या पुरस्काराने भागवत मसने यांचा यापूर्वी सन्मान करण्यात आला आहे. भागवत रामकृष्ण मसने हे हिंदी विषयात एम ए बी एड असून त्यांना के. के. एम. कॉलेज मानवत येथे वाद विवाद स्पर्धेत मराठवाडा स्तरावरील स्पर्धेचे पहिले बक्षीस मिळाले. महाविद्यालयीन जीवनात वाद विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा यामध्ये एकूण ३२ पारितोषिके



मिळवली आहेत.

भागवत मसने यांनी स्वतः पाच एकांकिका व पाच गीते लिहून विद्यालयाच्या विद्यार्थी चमूद्वारे बीड आकाशवाणीवर सादर केले आहेत. त्याचबरोबर मागील अनेक वर्षापासून विविध विद्यालय तथा महाविद्यालयात स्वतः हास्य व्यंगात्मक कार्यक्रम देखील सादर केले आहेत. अनेक ठिकाणी वाद-विवाद व वक्तृत्व स्पर्धेचे उत्तम असे परीक्षण करत अनेक कवी संमेलनाचे उत्तम व बहारदार असे सुत्रसंचलन करण्यात भागवत मसने यांचा हातखंडा आहे. या पुरस्कार सोहळ्यात अध्यक्ष म्हणून बोलताना माजी आमदार भिमराव धोंडे यांनी गंगाई-बाबाजी पुरस्काराबद्दल माहिती दिली. यापूर्वी हा पुरस्कार महाराष्ट्रातील विविध प्रतिष्ठित व्यक्तींना वितरित केल्याचे सांगितले. २०२५-२०२६ सालचा हा पुरस्कार शिक्षणाची पंढरी तथा मराठी भाषेचे जनक आद्यकवी मुकुंदराज स्वामीं च्या पावन भूमीतील एक सामान्य कुटुंबातील एक आदर्श शिक्षक भागवत मसने यांना देताना विशेष असा आनंद होत

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी आदिवासी विकास व संशोधन केंद्रात विचारांचा जागर




किनवट : येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्रात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक व स्त्रीमुक्तीच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा नव्या पिढीसमोर मांडण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे समन्वयक डॉ. मार्तंड कुलकर्णी होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून सावित्रीबाईंनी समाजपरिवर्तनाची प्रक्रिया गतिमान केली. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना आत्मसन्मान, स्वातंत्र्य आणि प्रगतीची दिशा दिली, असे प्रतिपादन त्यांनी केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित 'जीवनपट' (लघुपट) प्रदर्शित करण्यात आला. या लघुपटातून त्यांच्या संघर्षमय जीवनाची, सामाजिक अन्यायाविरुद्धच्या लढ्याची आणि शिक्षणासाठी केलेल्या अथक प्रयत्नांची प्रभावी मांडणी करण्यात आली.

केंद्राचे सह-समन्वयक डॉ. सुनील व्यवहारे यांनी आपल्या मनोगतात सावित्रीबाई फुले यांना केवळ शिक्षिका म्हणून पाहणे मर्यादित ठरेल, असे नमूद केले. त्या एक थोर समाजसुधारक, स्त्रीमुक्तीच्या प्रणेत्या आणि संवेदनशील कवयित्री होत्या. समाजातील अपमान, दगड-शेण सहन करूनही त्यांनी आपले कार्य अखंड सुरू ठेवले. त्यांचा संयम, धैर्य आणि जिद्द आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला केंद्राचे सह-समन्वयक डॉ. सुरेंद्र शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन गायकवाड यांनी केले. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य स्पष्ट करत आजच्या काळात त्यांच्या वैज्ञानिक, समतावादी आणि स्त्रीमुक्तीच्या विचारांची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. योगेश अंबुलगेकर यांनी केले.या वेळी केंद्रातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतींना अभिवादन करून व त्यांच्या विचारांचा जागर करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पोलीस रेझीन्ग डे निमित्त पोलीस विध्यार्थी संवाद...



तामसा /प्रतिनिधी

तामसा पोलीस ठाण्याचा वतीने पोलीस रेझिंग डे निमित्त पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसा येथे शाळेतील विद्यार्थी सोबत संवाद साधून त्यांना महिला अत्याचार, रॅगिंग ,महिला सुरक्षा विषयी उपाययोजना या संबंधाने सूचना दिल्या. तसेच पोलीस ठाणेला विद्यार्थ्यांचे भेटीचे आयोजन करून विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याचे कामकाज व शस्त्राबाबत माहिती दिली.विध्यार्थी पोलीस संवाद कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पोलिसांसोबत दिलखुलास गप्पागोष्टी क्राईम संदर्भात विचार आदान प्रदान करण्यात आलं यावेळी तामसा पोलीस ठाण्याचे सपोनि शहदेव खेडकर, गुप्त शाखेचे प्रकाश कबले,साई इन्स्टिट्यूट चे संचालक दिपक टव्हेकर, शाळेचे शिक्षक, शिक्षिका, विध्यार्थी उपस्थित होते.. विद्यार्थिनी ला सहायक पोलीस निरीक्षक शहदेव खेडकर यांनी शाळेत किंवा इतर ठिकाणी कुठेही अनुचित प्रकार घडत असेल किंवा छेडखानी होत असेल तर माझ्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधा असा आश्वासन खेडकर यांनी मुलींना दिले

# 'स्वारातीम' विद्यापीठात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



नांदेड /जिल्हा प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आज दि.३ जानेवारी, २०२६

रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर,राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, आयक्यूएसीचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, शिवराम लुटे, गोविंद हंबर्डे, बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# राहेरमध्ये अवैध विटभट्यांचा धुरळा; नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ, महसूल प्रशासन गाढ झोपेत!

नायगाव तालुक्यातील नियमांना केराची टोपली दाखवत नायगाव तालुक्यातील राहेर परिसरात रस्त्यालगतच ३० पेक्षा अधिक अवैध विटभट्या राजरोसपणे सुरू असल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. घनदाट धूर, धूळ व विषारी वायूंमुळे लहान मुले, वृद्ध आणि महिलांना श्वसनाचे आजार बळावत असताना, महसूल विभाग, तलाठी व मंडळाधिकारी मात्र ठोस कारवाई टाळत मौन पाळून आहेत, अशी तीव्र संतापजनक प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

अलीकडच्या काळात ग्रामीण व शहरी भागात घरकुल व इतर बांधकामांना मोठ्या प्रमाणावर मंजुरी मिळाल्याने विटांची मागणी वाढली आहे. याच संधीचा फायदा घेत राहेर परिसरात जागा मिळेल तिथे नियम धाब्यावर बसवत विटभट्या थाटण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, हे सर्व प्रकार संबंधित महसूल अधिकाऱ्यांच्या माहितीत असूनही कारवाईची हिंमत कुणीही दाखवत नाही, ही बाब गंभीर आहे.

शासनाच्या नियमांनुसार विटभट्या ठरावीक अंतरावर, रस्त्यापासून दूर व प्रदूषण नियंत्रणाच्या अटींचे पालन करूनच चालवणे बंधनकारक आहे. मात्र राहेर-उमरी, राहेर फाटा-हुसा, राहेर-कौलगाव रस्त्यालगत अवैध विटभट्या सुरू असून नियमांची सर्रास पायमल्ली होत आहे. रस्त्यालगत असलेल्या या विटभट्यांमुळे प्रदूषण नियंत्रण पूर्णपणे हाताबाहेर गेले असून त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार राहेर परिसरात जवळपास १०० च्या आसपास विटभट्या असून बहुसंख्य ठिकाणी नियमांचे उल्लंघन सुरू आहे. तरीही तलाठी व संबंधित अधिकारी 'मूग गिळून गप्प' बसल्याचे चित्र दिसत आहे. नियमानुसार कारवाई अपेक्षित असताना महसूल विभाग जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप होत आहे.

या सर्व प्रकारासाठी महसूल प्रशासन पूर्णतः जबाबदार असून कारवाईसाठी कोणतेही ठोस प्रयत्न होत नसल्याचे स्पष्ट दिसते. काही विटभट्या हप्ते देऊन चालवल्या जात असल्याची दबक्या आवाजात चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. जर तातडीने कारवाई झाली नाही, तर नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# समतावादी, विज्ञानवादी व स्त्रीमुक्तिवादी विचारांचा वारसा जपा - डॉ. प्रभावती गवळे



किनवट /प्रतिनिधी

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, मोहपुर येथे आयोजित कार्यक्रमात समतावादी, विज्ञानवादी व स्त्रीमुक्तिवादाच्या प्रणेत्या बना असे आवाहन डॉ. प्रभावती गवळे यांनी केले. सावित्रीबाईंनी सनातनी, कर्मठ व जात्यांध विचारांना विरोध करत महिलांना शिक्षणाचा मार्ग दाखवला, त्याग व संघर्षाची जाणीव ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. सुवर्णा देविदास आमले होत्या. यावेळी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष भगवान चिरंगे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आनंदा तांबरे, उपाध्यक्षा संगीता लकडे, पोलीस पाटील प्रदीप सोनटक्के यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी मनोगत व समूह नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाबद्दल पोलीस पाटील प्रदीप सोनटक्के यांनी पारितोषिके देऊन प्रोत्साहन दिले. सावित्रीबाईंच्या जीवनकार्याचे महत्त्व सौ. मनीषा सोनटक्के यांनी ओवीच्या माध्यमातून विशद केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सचिन नरवाडे, जेष्ठ पदवीधर शिक्षक ग. नू. जाधव, प्रा. शिक्षक रवींद्र चौधरी, संघरत्न घुले, गजानन राठोड, अमोल सुकलवाड, मारोती हापसे, आकाश वानोळे यांनी परिश्रम घेतले.

# सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालयाचे प्रा. द्वारकाप्रसाद वायाळ यांना पी.एच.डी. पदवी बहाल.



किनवट /प्रतिनिधी

किनवट येथील सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. द्वारकाप्रसाद वायाळ यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने राज्यशास्त्र या विषयात पी.एच.डी. (विद्यावाचस्पती) ही पदवी नुकतीच बहाल करण्यात आली. त्यांनी महाराष्ट्रातील काँग्रेसचे राजकारण या महत्त्वपूर्ण विषयावर आपले संशोधन कार्य यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

प्रा. द्वारकाप्रसाद वायाळ यांच्या संशोधन कार्यासाठी निवृत्त प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले तसेच प्रा. डॉ. आर. डी. शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या संशोधनातून महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची राजकीय वाटचाल, संघटनात्मक रचना, नेतृत्व, निवडणूक राजकारण तसेच राज्याच्या सामाजिक-राजकीय प्रक्रियांवर काँग्रेसच्या भूमिकेचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रा. द्वारकाप्रसाद वायाळ हे एक अभ्यासू प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून परिचित आहेत. आत्तापर्यंत त्यांची पाच पुस्तके प्रकाशित झालेली असून, त्यांनी २५ राष्ट्रीय परिषदांमध्ये तसेच दोन आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये आपल्या शोधनिबंधांचे सादरीकरण केले आहे. त्यांच्या संशोधनात्मक लेखनामुळे राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासात मोलाची भर पडली आहे.

प्रा. वायाळ यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल सरस्वती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व्यंकटराव नेम्मानिवार, डॉ. किरण नेम्मानिवार, सचिव प्रा. कृष्णकुमार नेम्मानिवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी, प्रा. सुनील व्यवहारे तसेच सर्व सहकारी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त प्रियदर्शनी मुलींचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कंधार येथे त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना व सावित्रीबाईच्या वेशभूषेतील मुलींचा शालेय साहित्य देऊन सत्कार करतांना, नांदेड जिल्हा महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा,तथा माजी जि.प.सदस्या सौ.वर्षाताई भोसीकर,यावेळी श्रीमती प्रतिभा बडवणे,सौ.शामा पाटील सौ.मनीषा कुरुडे,सौ.मिरा क्षीरसागर शेख यास्मिन व शालेय विद्यार्थिनी.

# बालिकांच्या भाषणातून सावित्रीबाईंचा विचार जागवला!

## सोमठाणा जिल्हा परिषद शाळेत बालिका दिन व माता-पालक मेळावा उत्साहात

नायगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोमठाणा येथे बालिका दिनानिमित्त क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून त्यांच्या शिक्षणविचारांना मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रभावी व अभ्यासपूर्ण भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली.

भाषण स्पर्धेत वेदिका मोरे (इ.७ वी) हिने प्रथम क्रमांक पटकावला. कु. ऐश्वर्या कदम (इ.४ थी) द्वितीय, तर कु. राहू कदम व कु. अनुष्का कदम (इ.२ री) यांनी तृतीय क्रमांक मिळवला. कु. राधिका कदम (इ.५ वी) हिला प्रोत्साहनपर बक्षीस प्रदान करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शाळेत माता-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात निपुण महाराष्ट्र अंतर्गत शाळेत राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक उपक्रम, गुणवत्ता व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत सविस्तर माहिती माता-पालकांना देण्यात आली. यावेळी निपुण प्रतिज्ञा घेऊन शिक्षणाबाबत सामूहिक बांधिलकी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका गव्हाणे मॅडम यांच्यासह शिक्षकवृंद आलमवाड सर, तोटेवाड सर, आडे सर, बुधप्पा सर, जमदडे सर, सौ. एकाळे मॅडम व सौ. आचेवाड मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, अभिव्यक्ती कौशल्य आणि सावित्रीबाईंच्या शिक्षणक्रांतीचा वारसा अधिक दृढ झाला.

नायगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोमठाणा येथे बालिका दिनानिमित्त क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून त्यांच्या शिक्षणविचारांना मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रभावी व अभ्यासपूर्ण भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली.

# जिल्हा परिषद चिंचोटी शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

वडवणी / प्रतिनिधी

समाजातील स्त्रीशिक्षणाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिंचोटी येथे अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे तसेच व्याख्याते म्हणून डॉ. अशोक काकडे (चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, घोडनदी, शिरूर) यांची विशेष उपस्थिती लाभली. आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनप्रवासावर प्रकाश टाकत, शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

या कार्यक्रमास सेवा सोसायटीचे चेअरमन महादेव गोंडे, विनोद काकडे, शिक्षणप्रेमी दिनकर गोंडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुशेन मायकर, उपाध्यक्ष सोनाजी गोंडे यांच्यासह गोरख जाधव, भागवत पाचणकर, लक्ष्मण सोनवणे, बालू उबाळे, समाधान काकडे, पांडुरंग गोंडे, रवी माने, अंकुश उजगरे, माऊली तात्या गोंडे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी भाषणे केली. तसेच श्रावणी गोंडे हिने सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित सुमधुर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भोज सर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. प्रास्ताविक शेंडगे सर यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन कांबळे सर यांनी केले.